महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद, मुंबई
Maharashtra Council of Acupuncture
202, 2nd Floor, Administrative/ Superintendent office Bldg.
Cama and Albless Hospital, Mahapalika Marg, Mumbai 400 001
Tel. : 022-22620376 | Email : mahacucouncil@gmail.com | Web : www.mahacucouncil.org

जा.क्र.मॲप/ॲक्यू. संस्था/ शै.वर्ष २०२६-२७ प्रवेश प्रक्रिया/५०२/२०२६ दिनांक-२७/०५/२०२६

विषय- सन २०२६- २७ या शैक्षणिक वर्षासाठी ॲक्यूपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया सुरु करणेबाबत.

महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषदेमार्फत सन २०२४-२५ व २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी ॲक्यूपंक्च्र चिकित्सा पदविका अभ्यासक्रमासाठी संस्थांना मान्यता व संलग्नता देण्यात आलेली आहे.

सदर संस्थांमध्ये पुर्ण क्षमतेने विद्यार्थी प्रवेश मिळविणे आवश्यक आहे. या संदर्भात झालेल्या बैठकांमध्ये ही बाब सविस्तरपणे चर्चिण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने सर्व संस्थाचालक व अध्यापकांनी पुर्ण क्षमतेने प्रयत्न करावेत.

बैठकीत जाहीर केल्याप्रमाणे सन २०२६-२७ या वर्षीचे ॲक्यूपंक्च्र चिकित्सा पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश प्रक्रिया दिनांक ०१ जुन, २०२६ पासून सुरु करण्यात येत आहेत. त्यानुसार संबंधित संस्थांनी मान्यता व संलग्नता मिळविण्यासाठी त्वरीत ऑनलाईन अर्ज सादर करावेत. सदर प्रवेश प्रक्रिया १५ जुलै २०२६ पर्यंत सुरु राहील. प्रवेशा संबंधिच्या मार्गदर्शक सुचना सोबतच्या परिपत्रकामध्ये नमुद केल्या आहेत. विहित मुदतीत प्रवेश प्रक्रिया राबवून प्रथम वर्ष प्रथम सत्राचे वर्ग दिनांक ०१/०८/२०२६ पासून सुरु करण्यात येईल. त्या अनुषंगाने सर्व संस्था प्रमुखांनी आवश्यक प्रवेश प्रक्रिया तत्परतेने राबवावी.

नारायण नवले
प्रबंधक
महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषद, मुंबई